कार्यारंभ आदेश

साठा बंधारा भोसे टेंमकरवस्ती
ता पाथर्डी जि अहमदनगर

**अहमदनगर जिल्हा परिषद**
**लघुपाटबंधारे विभाग**
**जि प आदेश क्र.कार्या-२/लेखा.४/निविदा/३१/१८**
**अहमदनगर दि. २४/०९/२०१८**

आपण सादर केलेली **साठा बंधारा भोसे टेंमकरवस्ती ता पाथर्डी जि. अहमदनगर** या कामाची ब-१ निविदा रक्कम **रुपये (१२३४२७२/-) अक्षरी रुपये बारालाख चोवतीस हजार दोनशे बाहतर मात्र निविदा रक्कमेच्या १५.०७ (टक्के) कमी दराने** मंजूर करण्यात आलेली आहे.

**दराडे दतात्र्य भगवान, मु.पो.पाथर्डी ता.पाथर्डी** यांनी निविदा स्विकृतीचे सर्व कागद पत्रावर स्वाक्षरी केली आहे. सदरचे काम **उपअभियंता जिल्हा परिषद ल पा उपविभाग पाथर्डी** यांचे देखरेखी खाली व सुचनेप्रमाणे पुर्ण करावे. कंत्राटदाराने काम विहित मुदतीत पुर्ण करणेचे दृष्टिने बांधकामाचे बाबीचे सुयोग्य नियोजन करुन त्याचा सविस्तर एकत्रिक कार्यक्रम इकडे सादर करावा.

काम सुरु झालेची तारीख आदेशाचे दिनांकापासून समजणेत येईल. **कामाची मुदत दि ३१/०३/२०१९** राहील. विहित मुदतीत काम पुर्ण होईल याची दक्षता कंत्राटदाराने घ्यावयाची आहे. सदरचे काम निविदेमधील शर्ती व अटी नुसार पुर्ण करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे. तसेच कामाचा व कामावर काम करणा-या मजुरांचा विमा विमा संचनालय मुंबई येथे उतरवण्याची जबाबदारीही संबंधित कंत्राटदाराची राहील. कामाचे ठिकाणी कामाचे नाव, कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश दिनांक, कामाची किंमत, काम पुर्ण करावयाचा दिनांक या सर्वांचा स्पष्ट उल्लेख करणेत येऊन तसा माहिती फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.काम वरील मुदतीत पुर्ण करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. ठेकेदारच्या देयकातुन कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम संबंधित आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झाले शिवाय परत केली जाणार नाही.

शासन निर्णय : महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. जलशि-२०१५/प्र क्र११५/जल-७ मंत्रालय मुंबई दि. १३ मार्च २०१५ नुसार खालील अटी शर्ती नुसार कामे करण्यास बंधनकारक आहे.

१.डिजीटल फोटो काम सुरु होणेपूर्वी काम सुरु असतांना व काम पूर्ण झाले नंतर त्यांचे डिजीटल फोटो (GPS Tagged) काढून ज्यामध्ये कामाच्या स्थळाच्या अक्षांश/रेखांश नमुद असेल असे फोटो काढून ते जनतेच्या माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

२. कामाचा दोषमुक्त दायित्व (Deffect Liabilities) कालावधी दोन वर्ष राहील सदर कालावधीत कामामध्ये दोष निर्माण झाल्यास व दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदार व संस्थेची राहील.

३. अंतिम देयक अदा करतांना अंमलबजवायची कार्यपध्दती- पूर्ण करण्यात आलेल्या कामाचे अंतीम देयक संबंधित यंत्रणा (Agency) ला अदा करण्यापूर्वी अंमलबजावणी करणा-या यंत्रणेतील अधिका-याने पूर्ण केलेल्या कामाची तपशिलवार माहिती ग्रामसभेस अवगत करणे देखील आवश्यक आहे. असे करत असतांना या संदर्भात ग्रामस्थांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अंतिम देयक न देता त्याची संपूर्ण शहानिशा करुन आणि कामाची गुणवत्ता तपासून कामाचे अंतिम देयक अदा करण्याची कार्यपध्दती अवलंबवण्यात यावी.

| | |
|---|---|
| **जि.प.लेखाशिर्ष संकेतांक** | **तपशिलवार लेखाशिर्ष** |
| **मुख्य लेखाशिर्ष :-** | **२७०२-५८४१ ल पा बिगर आदिवासी** |

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 20180924150461 आहे.

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**जि.प.ल.पा.विभाग**
**अहमदनगर**

**प्रति, दराडे दतात्र्य भगवान,मु.पो.पाथर्डी ता.पाथर्डी**
**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
**१)मा.जिल्हा अधिकारी अहमदनगर शाखा (रो.ह.यो)**
**२)मा.कार्यकारी अभियंता लघुसिंचन(जलसंधारण) अहमदनगर**
प्रत - उपअभियंता, **जि प ल पा** उपविभाग **पाथर्डी** जि. अहमदनगर यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

Scanned by CamScanner